# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०७/२०१८

**१) पर्समधुन नगदी पैसे व एटीएम कार्डची चोरी : –**

दिनांक २७/०७/२०१८ चे ०४.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी राजु रेवसिंग हिरेखन वय २७ वर्ष, रा. रजनी नगर खात रोड भंडारा खुल्या घराचे समोरील दारातुन प्रवेश करुन हॉलमध्ये रॅकवर ठेवलेल्या पर्समधुन नगदी २,५००/–रु. आयडीबीआय बॅंकेचा एटीएम कार्ड हे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे यांचे तोंडी रिपोर्ट वरून स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोबाईलची चोरी: –**

दिनांक २७/०७/२०१८ चे १७.०० ते १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे खुल्या घरामध्ये पलंगावर खुल्या जागेवर ठेवलेले १ ओपो कंपनीचा मोबाईल व १ सॅमसंग कंपनीचा मोबाईल किंमती असा एकुण किंमती १३,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेल्याने फिर्यादी गौरी मनोज दाढी वय ४० वर्ष, रा. रामदास मठ नरकेसरी वार्ड हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) घरात प्रवेश करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २७/०७/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे घराच्या छपरातील भिंतीला शेनाचे सारवण करीत असतांनी गावातील राहणाऱ्या आरोपीने पिण्याचे पाणी मागुन व फिर्यादी पाण्यांचा ग्लॉस घरामध्ये घेवुन जात असतांनी फिर्यादीचे मागेवुन जावुन घरात प्रवेश करुन फिर्यादीचे विनयभंग करुन जंगलाकडे पळुन गेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५२,३५४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २७/०७/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हां बस क्र. एमच १४ बिटी १६८१ ही चांदपुर वरुन तिरोडा येथे प्रवासी घेवुन जात असतांना वांगी येथे आरोपीच्या घराजवळ नालीत बस फसल्याने तिला काढत असतांना यातील आरोपी हा त्याठिकाणी येवुन तुम्ही बस रस्त्यावर का उभी केली व हातातील काठीने बसचे समोरील काचावर मारुन फोडल्याने अंदाजे २०,०००/–रु. चे सार्वजनीक मालमत्तेचे नुकसान केल्याने फिर्यादी अनिल लहुजी सिडामे वय ४० वर्ष बस ड्रायवर तिरोडा डेपो जि. गोदिया यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ५०४ भादवी. सहकलम ३ शा.मा.वि.कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. सेलोकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**५) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २७/०७/२०१८ चे ०१.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही तिचे घरी तिच्या लहान मुलीसोबत पलंगावर झोपली असातांना यातील आरोपी याने फिर्यादीचे घरातील मागील दाराची कडी उघडून घरात प्रवेश करुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३५४,३५४(अ), ४५२ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शेंडे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन पावडयाच्या दांडयाने मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २७/०७/२०१८ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरात प्रवेश करुन 'तु माझ्या मुलाला का पकडलास' असे बोलुन पावडयाच्या दांडयाने मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी संदीप रमेश शेंन्द्रे वय २८ वर्ष, रा. बेटाळा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५२,३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) एनडीपीएस अॅक्ट यांची कारवाई : –**

दिनांक २७/०७/२०१८ चे १६.५० ते २०.१० वाजता दरम्यान यातील आरोपीचे घराची झडती घेतली असता त्याचे घराचे लाकडी पलंगाचे खाली एक लहान टिनाचे पेटीमध्ये खाकी रंगाचे प्लॉस्टीक पिशवीत ५४० ग्रॅम गांजा, स्टिल पॉलीश असलेले लहान तराजु काटा ५००/–रु., ५००,२००,५० ग्रॅम वजनाचे जुने लोखंडी मापे किंमती १००/–रु. टिनाची पेटी, २००/–रु. असा एकुण ६,२००/–रु. चा माल अवैधरित्या मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनि. काळे स्थागुशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २०(ब), एनडीपीएस अॅक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

८) जनावरांना कत्तल करण्यासाठी आखुड दोराने चारापाणी विना बांधुन ठेवलेल्या स्थितीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –

दिनांक २७/०७/२०१८ चे ११.०० ते १२.३० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिरोजा हॉयस्कुलची जुनी पडकी ईमारती मध्ये स्वतःचे आर्थीक फायदया करीता ३ पांढऱ्या रंगाच्या गायी, व एक पांढऱ्या रंगाची लहान गाय, ३ पांढऱ्या रंगाचे गोरे, २ पांढऱ्या रंगाचे लहान गोरे असे एकुण १५,०००/–रु. चे चा माल कत्तल करण्यासाठी आखुड दोराने चारापाणी विना बांधुन ठेवलेल्या स्थितीत मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ५,५(क),९(अ) म. प्रा. सं. अधि. सहकलम ११(१) प्रा. कृ. वा. प्र. अधि १९६०. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २७/०७/२०१८ चे १३.०० ते १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा सुमो गाडी ही तहसिल टी पाईन्ट येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २७/०७/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोर ऑटो ही पवनी टि. पाईन्ट वरील डांबरी रोडवरील मध्ये येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. नेवारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. नेवारे पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

११) अवैध हातभट्टी/देशी दारू / जुगार अड्डयावर धाडी . :–

दिनांक २७/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध हातभट्टी दारु /जुगार अडड्यांवर धाडी घालुन पोलीस स्टेशन जवाहरनगर, साकोली, पालांदुर व भंडारा येथे अवैध हातभट्टी, देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८५ लिटर हा.भ. दारू १ डपकी किंमती ८६००/रु व १ लिटर ८० मिलीलीटर देशी किमती ३१२/रु. तसेच जगारातुन ३४१/रु. असा एकुण ९,२५३/रु चा माल जप्त करण्यात आला.

१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २७/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– १३ ईतर वाहनांवरती – १४७ केसेस करण्यात आले आहे.

(पोउपनी.जे.के.आडोळे)
जनसंपर्क अधिकारी
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.